आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२९ जुलै २०२४ -सोमवार

सरकारच्या विविध धोरणात्मक पावलांमुळे देशातला बेरोजगारीचा दर ३ पूर्णांक २ दशांश टक्क्यांपर्यंत खाली आल्याचं कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी आज लोकसभेत सांगितलं. प्रश्नोत्तराच्या तासाला पुरवणी प्रश्नांना ते उत्तर देत होते. येत्या काही वर्षांत बेरोजगारीचा दर ३ टक्क्यांच्या खाली येईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. येत्या पाच वर्षांत ४ कोटीपेक्षा जास्त युवकांना रोजगार आणि कौशल्यविकासाच्या संधी मिळतील, असं सांगून त्यांनी यंदाच्या अर्थसंकल्पाचं कौतुक केलं.

**<><><><><>**

दिल्ली इथल्या प्रशिक्षण केंद्रात विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाल्याच्या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी सर्वपक्षीय सदस्यांनी लोकसभेत केली.

या प्रकरणाचे पडसाद राज्यसभेतही उमटले. याबाबत आपल्या दालनात सर्व पक्षांच्या नेत्यांची बैठक घेणार असल्याचं धनखड यांनी सांगितलं.

**दरम्यान दिल्लीच्या** ओल्ड राजिंदर नगर भागातल्या १३ नागरी सेवा प्रशिक्षण केंद्रांच्या तळघरांना दिल्ली महानगर पालिकेनं टाळं ठोकलं आहे. प्रशिक्षण केंद्रात बुडून विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्या प्रकरणी दिल्ली पोलिसांनी आणखी पाच जणांना अटक केली असून एकूण आरोपींची संख्या सात झाली आहे.

**<><><><><>**

जपानच्या टोकियो इथं आयोजित ‘क्वाड’ परिषदेत परराष्ट्र मंत्र्यांची बैठक सुरू आहे. भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्यासह जपान, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया या देशांचे परराष्ट्र मंत्री या बैठकीला उपस्थित आहेत. जागतिक पातळीवर आर्थिक वाढ करणं हे एक मोठं आव्हान असून मानवनिर्मित

किंवा नैसर्गिक संकटांवर मात करण्यासाठी सामूहिक पातळीवर प्रयत्नांची आवश्यकता आहे, असं डॉ. जयशंकर या वेळी म्हणाले.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्ली इथं ‘विकसित भारताच्या दिशेने वाटचाल - केंद्रीय अर्थसंकल्पोत्तर परिषदे’ला संबोधित करणार आहेत. कन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीनं या परिषदेचं आयोजन केलं आहे.

<><><><><>

इराणमध्ये नुकत्याच झालेल्या ५४ व्या आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये सहभागी झालेल्या भारताच्या सर्व पाच विद्यार्थ्यांनी दोन सुवर्ण आणि तीन रौप्यपदकांची कमाई केली आहे. रिदम केडिया आणि वेद लाहोटी यांनी सुवर्ण, तर आकर्ष राज सहाय, भव्या तिवारी आणि जयवारी सिंह यांनी रौप्यपदकावर नाव कोरलं. भारतानं या स्पर्धेत चौथं स्थान पटकावलं. चीननं पहिला, रशियानं दुसरा, तर रोमानियानं तिसरा क्रमांक मिळवला.

<><><><><>

सर्वोच्च न्यायालयाच्या ७५व्या वर्धापनदिनानिमित्त आजपासून विशेष लोकअदालत सप्ताहाचं आयोजन केलं जात आहे. न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणं निकाली काढणं, हा या सप्ताहाचा मुख्य हेतू असल्याचं न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं.

<><><><><>

शल्यविशारद, बालरोगतज्ज्ञ आणि मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरु डॉ. स्नेहलता देशमुख यांचं आज सकाळी मुंबईत निधन झालं. त्या पंचाऐंशी वर्षांच्या होत्या. गर्भसंस्कार, नवजात शिशू तसंच माता यांच्या आहारासंदर्भात त्यांनी

महत्वपूर्ण काम केलं आहे. मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू म्हणून १९९५ मध्ये त्यांची नियुक्ती झाली. कुलगुरुपदाच्या आपल्या कारकिर्दीत त्यांनी विद्यापीठाच्या पदवी प्रमाणपत्रावर विद्यार्थ्याच्या आईचं नावही नमूद करण्यासारखे महत्वाचे निर्णय घेतले.

<><><><>

वाघ हा नैसर्गिक परिसंस्थेच्या सर्वोच्च स्थानावर असून वाघाचं संवर्धन म्हणजे नैसर्गिक परिसंस्थेचं संवर्धन असल्याचं वनसंरक्षक आयएफएस अधिकारी भरतसिंह हाडा यांनी सांगितलं. ते आज नागपूरात आंतरराष्ट्रीय व्याघ्रदिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ नागपूर एलीट आणि एशियाटिक बिग कॅट सोसायटी तर्फे आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी पोस्टर, बॅनर घेऊन 'वाघ बचाओ -पर्यावरण बचाओ' च्या घोषणा दिल्या.

<><><><>

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये आज नेमबाजी स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकाराच्या अंतिम फेरीत महिला गटात रमिता जिंदल हिला पदक मिळवण्यात अपयश आलं. अंतिम क्रमवारीत ती सातव्या स्थानापर्यंतच पोहोचू शकली. दरम्यान, या स्पर्धेच्या पुरुष गटात भारताकडून अर्जुन बबुता पदकासाठी मैदानात उतरणार आहे. याव्यतिरिक्त बॅडमिंटन, नेमबाजी, टेनिस, हॉकी, तिरंदाजी, टेबल टेनिस या खेळांमध्येही वैयक्तिक आणि सांघिक प्रकारात भारताचे खेळाडू पुढच्या फेरीत प्रवेश करण्यासाठी लढत देतील.

<><><><>

राज्यात आजही अनेक ठिकाणी पाऊस सुरु आहे.

**चंद्रपूर** जिल्ह्यात सततच्या पावसामुळे नदी, नाले, तलाव तुडुंब भरले असून जिल्ह्यातल्या इराई धरणाचे सातही दरवाजे उघडले आहेत. धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू असल्यामुळे प्रशासनानं नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. पावसामुळे  जनजीवन विस्कळित झालं असून अनेक मार्ग बंद झाले आहेत.

**धुळे** जिल्ह्यातही पहाटेपासून संततधार पाऊस कोसळत आहे. जिल्ह्यातल्या हतनुर धरणाच्या पाणी पातळीत वाढ झाल्यानं  आज सकाळी धरणाचे १० दरवाजे पूर्ण क्षमतेने उघडण्यात आले असून तापी नदी पात्रात विसर्ग करण्यात आला आहे. प्रशासनानं तापी काठावरच्या गावातल्या  नागरिकांना सावधानतेचा इशारा दिला आहे.

//<><><><><>//